# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :-

विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा उभारणे बाबत.

सदर्भ :- नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. मनपा-२०२२/प्र.क्र. ८०(२) न.वि.१६ मंत्रालय मुंबई दि. २७/०४/२०२२

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील **छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा उभारणे.** या कामाची बी-१ प्रकारची ई-निविदा (२,५४,००,३०५/- जी.एस.टी. वगळून) इतक्या रक्कमेची मागविण्यात आली होती. सदर कामाची तृतीय निविदा सुचना क्रं. १९३/२०२३-२४ (ऑनलाईन टेंडर क्र. १०२५२८१) वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन मागविणेत आली आहे. सदर कामासाठी एकुण दोन ई निविदा प्राप्त झालेल्या असुन, त्यापैकी निम्नतम दराचे निविदाकार **मे. सागर कन्स्ट्रक्शन कंपनी,** उल्हासनगर. यांनी दिलेला देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.६९ टक्के इतक्या कमी दराने असुन, त्यानुसार कामाची रक्कम रु. २,१९,२३,००३/- (**GST** व्यतिरिक्त) येत आहे.

**मे. सागर कन्स्ट्रक्शन कंपनी,** उल्हासनगर. यांची प्राकलन दराची ई निविदा रक्कम **रु. २,१९,२३,००३/-** (अक्षरी रु. दोन कोटी एकोणीस लाख तेवीस हजार तीन रुपये मात्र) (**GST** व्यतिरिक्त) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामीच्या प्रस्तावास प्र. शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त आधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक १९/०८/२०२४ रोजी पूर्व मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकीय ठराव मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :** ४९४      **दिनांक :-** २८/०८/२०२४

**छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा उभारणे.** कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. सागर कन्स्ट्रक्शन कंपनी,** उल्हासनगर. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.६९ टक्के इतक्या कमी दराची म्हणजेच रक्कम रु. २,१९,२३,००३/- (अक्षरी रु. दोन कोटी एकोणीस लाख तेवीस हजार तीन रुपये मात्र) (**GST** व्यतिरिक्त) इतक्या रक्कमेची निविदा मंजुरीस प्र. शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष:त कलम ४५२ अ (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, **छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा उभारणे.** याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. सागर कन्स्ट्रक्शन कंपनी,** उल्हासनगर. यांचे बरोबर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका